# अर्थ

बुधवार, ता. १७ फेब्रुवारी, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हातमागाच्या कापडाची परदेशांत नक्कल

भारतांत तयार होणारें निरनिराळ्या प्रकारचें हातमागाचें कापड ब्रह्मदेश, मलाया, इंडोनेशिआ, सीलोन, पाकिस्तान इत्यादि देशांत निर्यात केलें जातें. अमेरिकेलाहि भारतामधील हातमागाचें कापड निर्यात होतें. ह्या कापडाच्या लोकप्रियतेचा फायदा घेऊन कांहीं परदेशांत त्याची नक्कल यंत्राच्या साह्यानें करण्यांत येतें व असें नकली कापड अस्सल म्हणून विकलें जातें. हातमागाच्या कापडाच्या जाणकाराला. नकली कापड सहज ओळखतां येतें. पण सामान्य गिऱ्हाइकाला तसें कळणें अवघड जातें, म्हणून भारत सरकारनें कापडाचा खरेंपणा ओळखूं यावा म्हणून कांहीं उपाय योजण्याचें ठरविलें आहे. सध्यां भारतामधून दरसाल सुमारें ४ कोटी रुपयाचें हातमागाचें कापड निर्यात करण्यांत येतें. मद्रास राज्यांतून निर्यात होणारें कापड एकूण निर्यातीच्या सुमारें ८० ते ९० टक्के असतें. अलीकडे मात्र निर्यातींत घट झालेली आहे. १९५७ सालीं ९ कोटी रु. किंमतीचें हातमागाचें कापड निर्यात करण्यांत आलें होतें. हातमागाच्या कापडाची नक्कल यंत्राच्या साह्यानें करणें तितकेंसें सोपें नाहीं. ह्या कापडासाठी वापरण्यांत येणारे रंग व त्यांची संगति साधणें व कापड विणतांनाच त्यांत चमत्कृतिपूर्ण आकृति निर्माण करणें, ह्या गोष्टी पिढ्यानूपिढ्या विणकराचा धंदा करणाऱ्यांनाच साधतात. गिरण्यांनीं कितीहि प्रयत्न केले तरी ह्या गोष्टी त्यांना जमत नाहींत. तरीहि अमेरिकेंतील कांहीं कापड कारखानदारांनीं हातमागाच्या कापडाची नक्कल करून तें कापड स्वस्त भावांत विकलें असें आढळून आलें आहे. अखिल भारतीय विणकरसंघानें ह्या बाबतींत अमेरिकेच्या फेडरल ट्रेड कमिशनकडे तक्रारहि केली आहे.

---

## रशिआकडून मिळालेल्या कर्जाचा उपयोग

रशिआकडून भारताला मिळालेल्या कर्जाचा उपयोग कसा करावा ह्यासंबंधीं उभयतां देशांच्या प्रतिनिधींत वाटाघाटी चालू होत्या. आतां वाटाघाटी पूर्ण होऊन कर्जाच्या उपयोगाबाबत एक करार करण्यांत आला आहे. सप्टेंबर १९५९ मध्यें रशिआनें भारताला १५० कोटी रुबलसचें कर्ज देण्याची तयारी दाखविली व भारतानें ह्या सूचनेला होकार दिला. १५० कोटी रुबल्स म्हणजे सुमारें १८० कोटी रुपये होतात. ह्या रकमेचा उपयोग करून सार्वजनिक मालकीच्या विभागांत नवे उद्योगधंदे उभारण्याचें ठरविण्यांत आलें आहे. भिलई येथें रशिआच्या सहकार्यानें जो पोलादाचा कारखाना उभारण्यांत आला आहे, त्याचा विस्तार करण्यासाठीं वरील रकमेपैकीं बरीच रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. भिलई येथील पोलादाचे उत्पादन दरसाल १० लाख टनांपासून २५ लाख टनांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. त्याशिवाय हिंदमधील खनिज तेलखाणीचा धंदा उभारण्यासाठींहि कर्जाचा उपयोग करण्यांत येणार आहे. कांहीं रक्कम कोळशाच्या खाणींत करण्यांत येणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी, वीजकेंद्रांची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी आणि बिहारमधील बरौनी येथें तेलशुद्धीचा दुसरा कारखाना उभारण्यासाठी वापरण्यांत येणार आहे. रशिआच्या मदतीनें हिंदमधील तेलखाणीचा धंदा लवकर उभारतां येईल असें दिसतें. कारण, तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री रशिआकडून मिळणार असून हिंदी तेलतंत्रज्ञांना रशिआंत नेऊन शिक्षण देण्याची सोयहि करण्यांत येणार आहे.

---

## साखरेच्या उत्पादनवाढीचे बिहारचे प्रयत्न

बिहारमधील साखर कारखाने चालू हंगामांत अधिक साखरेचे उत्पादन करतील असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षीच्या हंगामांत राज्यांतील कारखान्यांनीं ८४·३२ लाख मण साखर निर्माण केली होती. गेल्या कांहीं वर्षांत बिहारमधील कारखान्यांतून हंगामांत गाळल्या जाणाऱ्या उसाचें प्रमाण वाढत चाललें आहे; परंतु प्रत्यक्ष साखरेच्या उत्पादनांत मात्र वाढ झालेली दिसून येत नाहीं. उसापासून होणाऱ्या साखरेच्या उताऱ्यांत घट झाल्यामुळें असें होत आहे. साखरेच्या कारखान्यांना पूर्वी आयात होणाऱ्या साखरेचा मोठा धोका होता. पण साखरधंद्याला संरक्षक जकातीचा आधार मिळाल्यावर भारतामधील सर्वच कारखाने सावरले. तथापि बिहारमधील साखर कारखान्यांना आतां नव्याच स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. भारतामधील इतर राज्यांतून साखरेचे कारखाने वाढत चालले आहेत. उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतांत साखरेच्या कारखान्यांना अधिक अनुकूल परिस्थिति लाभते. त्यामुळें मुंबई, मद्रास व म्हैसूर राज्यांतील साखर-कारखान्यांशीं बिहारमधील कारखान्यांना स्पर्धा करावी लागत आहे. साखर उत्पन्न करणाऱ्या राज्यांत बिहारचा एकेकाळीं दुसरा अनुक्रम होता. पण आतां दुसरी जागा मुंबई राज्यानें पटकाविली आहे. गेल्या हंगामांत मुंबई राज्यानें २·२१ लाख टन साखर निर्माण केली तर बिहारनें २·१० लाख टन निर्माण केली. बिहार सरकारनें ह्या बदललेल्या परिस्थितीचा गंभीरपणें विचार केला असून बिहारमधील उसाचें दर एकरीं पीक वाढविण्याचे आणि साखरेचा उतारा वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. ह्या कामीं पुसा येथील ऊस-संशोधन केंद्राकडून चांगली मदत मिळण्याचा संभव आहे.

---

**श्रीशैलम् जलविद्युत् योजना**—आंध्र राज्यांतील श्रीशैलम् जलविद्युत् योजनेसाठी विमानांतून पाहणी करण्यांत येणार आहे. ह्या पहाणीसाठी राज्यसरकारनें १,९४,००० रुपये मंजूर केले आहेत. योजनेसाठी ३४ कोटी रुपये खर्च येणार असून ती पूर्ण झाल्यावर ५,००,००० किलोवॅट वीज निर्माण होईल. आंध्र सरकारनें ह्या योजनेचा तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समावेश केला आहे.

## मुद्रित-शोधन

लेखक : श्री. य. ए. घायगुडे, प्रमुख मुद्रित-शोधक, आर्यभूषण मुद्रणालय, पुणे ४.

प्रकाशक : श्री. वि. ग. माटे, चिटणीस, पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन लि., पुणें २.

पृष्ठसंख्या : १४८, किंमत ३ रु.

मुद्रण-व्यवसायासाठी मराठी भाषेमध्यें तंत्रविषयक वाङ्मय हाताच्या बोटांवर मोजण्याइतकें थोडें निर्माण झालें आहे. पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन 'मुद्रण-प्रकाश' हें मासिक चालवीत आहे. तांत्रिक विषयावरचें वाङ्मय पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास ह्या प्रकाशनानें आतां प्रारंभ होत आहे. मुद्रित-शोधक ज्ञानानें जितके परिपूर्ण असतील, तितकी शुद्ध छपाई होऊं शकेल. ह्या शास्त्राचा गाढ अभ्यास करणारे श्री. घायगुडे ह्यांचा प्रस्तुत ग्रंथ जळगांव येथें महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या अधिवेशन-प्रसंगीं दि. ३० जानेवारी १९६० रोजीं प्रसिद्ध झाला. श्री. घायगुडे ह्यांनीं व्यवसायकरण नांवाचें कांहीं ऋण असतें हें मान्य करण्यांतच नव्हे, तर त्यांतून मुक्त होण्यासाठी हा ग्रंथ लिहिण्यांत असामान्य वैशिष्ट्य दाखविलें आहे. एखाद्या छापखान्यांतल्या अडगळीच्या जागेंत मुद्राराक्षसाच्या विनोदाचा विषय बनलेल्या सामान्य प्रुफरीडराच्या अंगीं ध्येयवाद असेल आणि त्याला कष्टाची जोड मिळेल, तर तो किती मान्यतेस पोंचूं शकतो, ह्याचें श्री. घायगुडे हे उत्कृष्ट उदाहरण आहेत. आपल्या व्यवसायाचा दर्जा वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी होत आहे, ही अतिशय अभिनंदनाची गोष्ट आहे.

प्रस्तुत ग्रंथामध्यें, लेखकानें प्रथम शुद्ध मुद्रणाचें महत्त्व सांगून मुद्रित-शोधकाचें स्थान दिग्दर्शित केलें आहे. "शुद्ध व सुबक मुद्रणासाठीं हुशार, व्याकरण व व्युत्पत्ति जाणणारा, सामान्य ज्ञान भरपूर असणारा, सौंदर्याभिरुचि असणारा, सूक्ष्म-दृष्टि, बहुश्रुत व कष्टाळू मुद्रित-शोधक असणें जरूर आहे." ह्याची मीमांसा लेखकानें पुढें केली आहे; आणि मुद्रित-शोधकाचीं कर्तव्यें सांगितलीं आहेत. शोधक-साहाय्यक, मुद्रित-शोधन खुणा, मुद्रणयंत्र, मायबोलीचें शुद्धलेखन, तोड-जोड व संक्षिप्त शब्द, अशुद्ध शब्दांची जंत्री, इतर भाषांचें मुद्रित-शोधन, ग्रंथांचें मुद्रित-शोधन, ग्रंथेतर मुद्रित-शोधन, हीं शीर्षकें त्या त्या प्रकरणांतील विवेचनाची कल्पना देतील. ग्रंथाच्या अखेरीस चार परिशिष्टें देण्यांत आलीं आहेत:—(१) म. सा. प. चे शुद्धलेखन नियम, (२) उपयुक्त कोष्टकें, (३) रासायनिक मूल द्रव्यांचीं संक्षिप्त चिन्हें व (४) निरनिराळीं चिन्हें. मुद्रित-शोधनाच्या खुणांचा विस्तृत तक्ता दिलेला आहे, त्यांत खूण, खुणेचें नांव व अर्थ, खूण मूळ मजकुरांत आणि बाजूस कशी करावी, ह्याचा सविस्तर तपशील दिलेला आहे. दुसऱ्या एका तक्त्यांत ह्या खुणा केलेलें मराठी व इंग्रजी मुद्रित कसें दिसेल, त्याचे ठसे दिले आहेत. हे दोन्ही तक्ते नजरेखालून घालणाराला, सबंध ग्रंथ वाचून काढावा, असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. मुद्रित शोधनाचा श्रीगणेशा म्हणजे हे तक्ते निरीक्षण करून आत्मसात् करणें.

ह्या छोट्या परीक्षणांत प्रस्तुत ग्रंथांतील सर्व उपयुक्त माहितीचा परामर्श घेणें केवळ अशक्य आहे. मुद्रित शोधनाच्या व्यवसायांत गुंतलेल्यांना व त्याच्याशीं संबंध असणाऱ्यांना हा ग्रंथ मार्गदर्शक ठरणारा आहे. मुद्रणालयांतून छपाईचें काम करून घेणाऱ्या असंख्य ग्राहकांनीं हा ग्रंथ अवश्य नजरेखालून घालावा; म्हणजे त्यांना छपाईचें काम अधिक चांगलें करवून घेण्यास साहाय्य होईल आणि मुद्रितशोधनांतील अडचणींची माहिती झाल्यावर ते ह्या उपेक्षित व्यवसायाकडे अधिक सहानुभूतीनेंच नव्हे, तर आदरानें बघूं शकतील. कित्येक विद्वानांचीं हस्तलिखितें मुद्रित शोधकांच्या काटेकोर तपासणीमुळेंच शुद्ध स्वरूपांत बाहेर पडूं शकतात, हें फारच थोड्यांना माहीत आहे.

---

### फिल्म कंपन्यांच्या व्यवहाराचें एकत्रीकरण

मेट्रो-गोल्डविन-मेयर इंडिया लि. आणि युनिव्हर्सल पिक्चर्स इंडिया (प्रा.) लि. ह्या दोन प्रमुख अमेरिकन विदेशी चित्रपट-वितरक कंपन्यांनीं एकमेकांशीं सहकार्य करून चित्रपट-वितरणाचें काम अधिक काटकसरीचें व कार्यक्षम व्हावें अशी योजना आंखली आहे. युनिव्हर्सल पिक्चर्स इंडिया (प्रा.) लि.नें आयात केलेले चित्रपट ह्यापुढें मेट्रो-गोल्डविन-मेयर इंडिया लि. मार्फतच प्रसिद्धीसाठी धाडले जातील. दोन्ही कंपन्यांचें स्वतंत्र अस्तित्व कायमच राहील.

---

### थंड हवेच्या ठिकाणीं जाण्यासाठी रेल्वेचीं सवलतीच्या दराचीं तिकिटें

मागील वर्षाप्रमाणेंच यंदाहि उन्हाळ्यांत थंड हवेच्या ठिकाणीं जाण्यासाठी १ एप्रिल, १९६० पासून एकेरी प्रवास भाड्याच्या दीडपट आकार घेऊन सवलतीचें परतीचें तिकीट देण्याचा निर्णय रेल्वे बोर्डानें घेतला आहे. हीं तिकिटें घेतल्या-पासून तीन महिन्यांच्या आंत जाण्यायेण्याचा प्रवास पुरा करावा लागेल.

---


### दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें २

### नोटिस

नोटिस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची २५ वी वार्षिक साधारण सभा मंगळवार दिनांक १५ मार्च, १९६० रोजीं दुपारीं ४ वाजतां (भारतीय प्रमाणवेळ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, महाराष्ट्र बँक इमारत, ११७७ बुधवार पेठ, पुणें शहर या ठिकाणीं, नेहमीच्या कामकाजासाठी म्हणजे ३१ डिसेंबर १९५९ चा ताळेबंद व नफा-तोटापत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणाऱ्या संचालकांच्या जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेबतपासनिसांची नेमणूक करणें वगैरेसाठी व कांहीं विशेष स्वरुपाच्या कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणाऱ्या विशेष स्वरूपाच्या कामकाजाचा तपशील भागीदारांस बँकेचा दि. ३१ डिसेंबर १९५९ अखेरचा ताळेबंद व नफा-तोटापत्रक व संचालकांचा अहवाल यांसोबत स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

पुणें
दि. ५ फेब्रुवारी १९६०

बोर्डाच्या हुकुमावरून,
सी. व्ही. जोग, मॅनेजर.

बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें दिनांक २ मार्च, १९६० ते दिनांक १६ मार्च, १९६० (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शनिवार दिनांक २६ मार्च १९६० पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील.

पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा

[ अध्यक्ष श्री. कृ. वा. ढमढेरे यांनी चेंबरच्या तेहतिसाव्या वर्षाच्या प्रथम त्रैमासिक सर्वसाधारण सभेपुढें बुधवार दिनांक १० फेब्रुवारी १९६० रोजीं केलेल्या भाषणाचा सारांश ]

### महाराष्ट्र राज्य

गुजराथ आणि महाराष्ट्र राज्यें स्थापन होण्याच्या सुमारास आपली ही सभा होत आहे. मनांतील इप्सित साध्य झाल्यामुळें आपणां सर्वांना आनंद साहजिकच होत आहे. मान्यवर अशा तत्त्वांच्या आधारें सीमाप्रश्न सोडविण्यांत यावेत असें मी गेल्या वेळच्या भाषणांत सुचविलें होतें. आपण अशी आशा करूं या कीं अजूनहि हे प्रश्न योग्यपणें परस्परांच्या आणि अंतिम हिताच्या दृष्टीनें सोडविले जातील. आपल्या मनांतील विचारांना अनुलक्षून नवीन राज्याचें नांव महाराष्ट्र असावें असें या विभागांतील सर्वांनाच वाटेल. नवीन राज्य स्थापनेबरोबरच सर्वांवरच आणि खास करून व्यापारी समाजावर अधिकच जबाबदाऱ्या येऊन पडणार आहेत. कांहीं केंद्रें वगळल्यास उरलेला महाराष्ट्र अविकसित आहे ह्या विभागांना इतरांबरोबर आणून शेतीविषयक व औद्योगिक प्रगति जलद घडवून आणण्याच्या दृष्टीनें त्यांना सर्वतोपरी मदत केली पाहिजे. अविकसित विभाग कोणत्या भागांत आहेत हें विचारांत न घेतां त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कसून प्रयत्न केले पाहिजेत या राज्याची सर्वांगीण प्रगति घडवून आणण्याचें ध्येय आपण बाळगलें पाहिजे. या प्रगतींत सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीसुद्धां अभिप्रेत आहे. या सर्व दृष्टीनें विकास घडवून आणल्यावरच आपले संत, राजकारणी, धुरंधुर, देशभक्त आणि तत्त्ववेत्ते यांनीं आतांपर्यंत उराशीं बाळगलेल्या महाराष्ट्राचें स्वप्न साकार होइल. आपल्यांत तत्त्वनिष्ठा, ध्येयसेवा, यासारख्या गुणांची जी इतिहासपरंपरा आहे त्यांचे बळावर हें ध्येय गांठणें शक्य होईल असा आम्हांला विश्वास वाटतो. तसेंच आजपर्यंतची परंपरा आणि उत्तम राज्यव्यवस्था विचारांत घेतां येथें लोकशाहीचीं मुळें खोलवर रुजून त्यांचा इतरांना आदर्श होऊन आपापल्या परीनें भारताच्या प्रगतीस महाराष्ट्र चालना देईल असा भरंवसा मला वाटतो.

### महाराष्ट्र आर्थिक विकास समिति

महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास घडून यावा या ध्येयानें महाराष्ट्र आर्थिक विकास समिति गेलीं तीन वर्षें कार्य करीत असून नवीन राज्याच्या विकासाच्या समस्या आणि विकासाचा मार्ग यासंबंधानें विचार करण्याकरितां एक परिषद ही समिति भरवील. मला आशा आहे कीं, ज्यांना महाराष्ट्राच्या विकासाविषयीं आस्था आहे ते सर्व त्यांत सक्रीय भाग घेतील.

### आंतरराष्ट्रीय परिस्थिति

भारतानें अवलंबिलेल्या धोरणामुळें त्यास सर्व राष्ट्रांकडून सद्भावना मिळवितां आली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष श्री. आयसेनहॉवर आणि रशियाचे अध्यक्ष श्री. व्होरोशिलाव यांनीं भारताला नुकतीच दिलेली भेट ते भारताला देत असलेलें महत्त्व दर्शविते. या आशादाई वातावरणांत भारताच्या सरहद्दीवर चीननें केलेल्या हल्ल्यामुळें अतिशय खेद होत आहे. नुकताच ब्रह्मदेश व चीन यांच्यांत अनाक्रमणाचा जो करार झाला आहे त्यावरून जागतिक विचारांच्या दडपणामुळें भारताबरोबरील वितुष्ट मिटविण्यास चीन तयार होईल अशी आशा वाटते. तरीसुद्धां आपण देशाच्या संरक्षणासाठी सदैव जागरूक असणें जरूर आहे मोठमोठे व मूलभूत उद्योग विकास पावल्यासेरीज भारत संरक्षणक्षम होणार नाहीं यावर आपल्या पंतप्रधानांनीं भर दिला आहे.

### मॅनेजिंग एजन्सी

मॅनेजिंग एजंटसूनीं भारताच्या औद्योगीकरणास चालना दिली असून त्याबद्दल त्यांना योग्य तें श्रेय पण दिलें पाहिजे. परकीय स्पर्धकांना मिळणाऱ्या मदती विरुद्ध तसेंच प्रतिकूल राजकीय वातावरणांत व परराष्ट्रीय स्पर्धेस त्यांना तोंड द्यावें लागत होतें. परंतु यांतूनहि दीर्घ परिश्रमांच्या बळावर यश मिळवून त्यांनीं कापड, ताग, साखर, इंजिनियरिंग इ. उद्योगधंदे वाढीस लावले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरसुद्धां त्यांनीं निरनिराळे उद्योग स्थापून महत्वाचें व मानाचें स्थान प्राप्त केलें आहे. आपल्या दीर्घ अनुभवाच्या बळावर नवीन उद्योग स्थापन करून ते उर्जितावस्थेंत आणले. तंत्र आणि वित्त यांचा वापर त्यांनीं केला. त्यासाठी त्यांना कांहीं वेळां धोका पत्करून मोठ्या आपत्तींना तोंड द्यावें लागतें. आजसुद्धां नवीन उद्योग स्थापून अर्थ विकासाला मॅनेजिंग एजंटस् हातभार लावतील. आजच्या परिस्थितींतसुद्धां सरकारनें घालून दिलेल्या मर्यादेंत परकीय सहकार्य मिळवून त्यांतून वित्त आणि तंत्रज्ञ मिळवून नवीन उद्योग स्थापन करतांना मॅनेजिंग एजंटस् दिसून येतात. दुर्दैवानें त्यांच्या कार्यांत अडथळे आणून सरकार त्यांची प्रगति रोखून धरीत आहे कराराची मुदत वीस वर्षांवरून कमी कमी करून ती आज दहापेक्षा कमी केल्यामुळें तसेंच त्यांच्या उत्पन्नाला कात्री लावीत ते प्रथम १० टक्के व पुढें ४ टक्केपर्यंत आणल्यामुळें मॅनेजिंग एजंटसच्या मनांत घबराटीचें सांशकतेचें अस्थिर वातावरण निर्माण झालें आहे. त्यामुळें त्यांना नवनवीन उद्योग च्या विकासाचें कार्य हातीं घेण्यास उमेद राहिलेली नाहीं. कारण एखादा उद्योग स्थिरावून प्रगतीपथावर येण्यास दीर्घ काळाची आवश्यकता असते. पहिलीं कांहीं वर्षें केवळ यशाचा पाया रोवण्यांत खर्च होतात. हें सर्व विचारांत घेऊन त्यांच्या संबंधींचें आपले दीर्घ मुदतीचें धोरण सरकारनें जाहीर केलें तर उद्योग स्थापण्यास मॅनेजिंग एजंटसूना नवीन चालना मिळेल.

### करपद्धत

मोठमोठे उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी भरपूर साधनसामुग्री लागेल. त्याचबरोबर पोषक वातावरणहि निर्माण करणें आवश्यक आहे. जोंपर्यंत व्यक्तीस आपल्या परिश्रमांचें योग्य फळ मिळण्याची खात्री येत नाहीं, तोंपर्यंत मोठमोठ्या उद्योगांच्या विकासाला चालना आणि गती प्राप्त होणार नाहीं. सर्व आर्थिक व्यवहारांचें अंतिम ध्येय फलप्राप्ति हें असतें. सध्याच्या करपद्धतीमुळें जास्तींत जास्त आर्थिक हालचाल होऊं शकत नाहीं. मध्यवर्ती सरकारकडून उपलब्ध साधनसामुग्रींतून अधिकाधिक प्रयत्न करण्यास उत्साहाचें वातावरण राहिलेलें नाहीं. विकासक्षम अर्थव्यवस्थेंत करांचा बोजा सर्वांवर सारखा पडेल यासाठी प्रयत्न करणें जरूर आहे. पुरेशी माहिती, अभ्यासपूर्ण सूचना तसेंच तज्ज्ञांचे अहवाल उपलब्ध आहेत. अशा वेळीं ज्यायोगें उद्योगांना अधिक वाव मिळवून पुढील विकासासाठी अधिकाधिक संपत्ति गुंतविण्यास प्रोत्साहन मिळेल अशी करव्यवस्था घडविणें आवश्यक आहे.

आज कंपनी लहान असो कीं मोठी असो, सर्व कंपन्यांना द्याव्या लागणाऱ्या करांचें प्रमाण मात्र सारखेंच आहे. लहान उद्योगांप्रमाणेंच कंपन्यांचें मोठ्या, मध्यम आणि लहान असें वर्गीकरण करून प्राप्तीकराप्रमाणें त्यावरील कर उतरत्या भांजणी

प्रमाणें असावा. लहान कंपन्यांवरील करांचें प्रमाण कमी केल्यास तें उचितच होईल.

### तिसरी योजना

तिसऱ्या योजनेचा आराखडा तयार करण्याचें कार्य प्लॅनिंग कमिशन तसेंच राज्य सरकार यांचें लक्ष वेधित आहे. या कार्यात व्यापारी समाजानें रस घेणें योग्यच होय. नियोजनाचा आजपर्यंतचा अनुभव आणि प्रगतीची गति लक्षांत घेतां तिसरी योजना मोठी आणि उत्कृष्ट असावी हें स्वाभाविकच आहे.

वेगवेगळ्या विचारसरणीच्या लोकांनीं औद्योगिक प्रगतीवर भर द्यावा असें प्रतिपादिलें तर कांहींनीं शेतीविकासावर भर द्यावा असें मत निरनिराळ्या प्रसंगीं व्यक्त केलें. परंतु या दोहोंचा समतोल विकास घडवून आणावा आणि कोणा एकाकडे दुर्लक्ष करूं नये असें आमचें मत आहे.

अन्नधान्यपुरवठा वाढवीत असतांना ज्यापासून झरझर फलप्राप्ति होईल अशा योजनांना अग्रहक्क द्यावा. नवीन जमीन लागवडीसाठीं आणण्याच्या शक्यतेस असलेला मर्यादा विचारांत घेतां दर एकरीं उत्पन्न वाढविण्यावर भर दिला पाहिजे. यादृष्टीनें सध्यां प्रत्येक तालुक्यांत प्रत्येक पिकाचा दर एकरीं जास्तींत जास्त उतारा काढणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तेजनार्थ म्हणून बक्षिसें देण्याचें सरकारचें धोरण स्वागतार्ह आहे.

### दळणवळण

उद्योग व शेतीप्रमाणेंच दळणवळणाचीं साधनें आर्थिक विकासांत महत्त्वाचें कार्य करीत असतात. परस्परांत स्पर्धा करीत असलेल्या निरनिराळ्या दळणवळणाच्या साधनांत सुसूत्रीकरण घडवून आणण्याच्या दृष्टीनें उच्च पातळीवरून विचार होत आहे. त्यांनीं केलेल्या सूचना व्यवहारी असून त्या किफायतशीर दरांत जास्तींत जास्त दळणवळण घडवून आणतील व हें करीत असतांना उपलब्ध साधनांचा अधिकाधिक उपयोग कसा करतां येईल याचा विचार व्हावा. दळणवळणाच्या कार्यक्षम साधनास योग्य तें स्थान द्यावें हें सर्वांनाच पटतें. श्री. एम्. आर. मसानी यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या समितीनें मोटारवहातूक कार्यक्षम असून तिला तृतीय योजनेंत, योग्य स्थान असावें असें सुचविलें आहे. दुर्दैवानें करांच्या ओझ्याखालीं तसेंच अन्य नियंत्रणाखालीं मोटार वहातूक दबली गेली आहे. मोटारवहातुकीस पूरक अंग मानून त्या दृष्टीनें परस्परांत सुसूत्रता आणल्यास त्याचा अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम होईल.

### किनाऱ्यावरील वहातूक

समुद्रकांठच्या जिल्ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें नवीन महाराष्ट्र राज्यास किनाऱ्यावरील वहातुकीच्या प्रश्नाकडे अधिकाधिक लक्ष द्यावें लागेल. दक्षिण भागांतून वहातूक वाढतच आहे. रस्त्यांच्या अलीकडील विकासाचा त्यावर परिणाम झालेला नाहीं. सध्यां बोटीच्या वहातुकीच्या दरांच्या प्रश्नाचा रांव कमिटी विचार करीत आहे. कोंकणांतील लोकांच्या गरजा विचारांत घेऊन तसेंच आगबोट कंपन्यांची परिस्थिति पाहून या प्रश्नाकडे लक्ष पुरविणे जरूर आहे.

त्या दृष्टीनें कोंकण किनाऱ्यावरील बंदरांच्या विकासालाहि महत्त्व आहे. वेंगुर्लें, जयगड, विजयदुर्ग, रत्नागिरी, इ. बंदरें बारमाही करून तीं हमरस्त्यांशी जोडण्यांत यावींत, ह्या महत्त्वपूर्ण कार्यास चालना देऊन या कोंकण विभागाची आर्थिक प्रगति सत्वर घडवून आणण्याच्या दृष्टीनें इतरांबरोबर येणें त्याला शक्य करून द्यावें.

### विडी उद्योग

आपल्या चेंबरनें महाराष्ट्रांतील विडी-कारखानदारांची परिषद् घ्यावयाचें ठरविलें आहे. विकेंद्रित असा हा व्यवसाय ग्रामीण विभागांतील लोकांना त्यांच्या घरादाराजवळ रोजगारी प्राप्त करून देतो. ह्या उद्योगास यंत्रांची आवश्यकता नाहीं, परकीय चलन लागत नाहीं. केवळ मानवी हातांनीं विड्या तयार होत असतात.

सरकारनें लादलेल्या नियंत्रणामुळ हा व्यवसाय राज्याबाहेर जात आहे कारण तेथें तापदायक नियंत्रणें नाहींत तेथून मुंबई राज्यांत विड्या किफायतशीर दरानें पाठविणें त्यांना शक्य होतें. विविध राज्यांच्या हिताच्या दृष्टीनें मध्यवर्ती सरकारनें सर्व राज्यांत एकसूत्र आणि योग्य नियंत्रणें आणावींत. दरम्यान या धंद्याचा सर्वांगीण विचार करण्यासाठीं एक प्रातिनिधिक समिति नेमावी अशी विनंती मी राज्य सरकारास करतों.

---

## नागपूर येथें द्राक्षांचें प्रदर्शन

मुंबई सरकारच्या शेतकी खात्यामार्फत दरवर्षी भरविण्यांत येणारें प्रदर्शन या वर्षी नागपूर येथील महाराज बागेंत भरावण्यांत येणार आहे. द्राक्षांची लागवड करणाऱ्या धंदेवाईक आणि हौशी बागाईतदारांना द्राक्षाच्या निरनिराळ्या प्रकारांसंबंधीं माहिती मिळावी व किफायतशीर लागवड करण्यास प्रोत्साहन मिळावें या दुहेरी उद्देशानें मागील वर्षापासून द्राक्षांचें प्रदर्शन भरविण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला व पहिलें प्रदर्शन पुणें येथें भरविण्यांत आलें.

नागपूर येथील प्रदर्शन दि. ५ ते ७ मार्चपर्यंत भरेल. प्रदर्शनांत ठेवण्यांत आलेल्या द्राक्षांच्या उत्कृष्ट नमुन्यास पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकांचीं बक्षिसें देण्यांत येतील शिवाय द्राक्षांच्या सर्वोत्कृष्ट संग्रहाबद्दल खास रोख बक्षिसेंहि देण्यांत येतील. प्रदर्शनामध्यें पुढील जातीं ठेवण्यांत येतील. (१) भोकरी (२) निवड नं. ९४ (३) निवड नं. ७ (४) गुलाबी (५) बेंगलोरी (६) आमब–ए शाही (७) पांढरी साहेबी.

सरकारी, निमसरकारी संस्था अगर व्यावसायिक आणि हौशी बागाइतदारांना प्रदर्शनाकरतां आपल्या द्राक्षांच्या विविध जाती पाठवितां येतील. प्रवेश फी फक्त १ रु. असून यांत कितीहि प्रकारचे नमुने पाठवितां येतील. विशिष्ट प्रवेश-फॉर्म व सोबतचे द्राक्षांचे प्रकार पाठवावे लागतील. नियम व फॉर्मस (१) हॉर्टिकल्चरल डेव्हलपमेंट ऑफिसर बॉंबे स्टेट, पुणें ५ किंवा (२) जिल्हा शेतकरी अधिकारी यांचेकडून मिळूं शकतील.

प्रदर्शनांत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांनीं आपल्या द्राक्षांचे नमुने हॉर्टिकल्चरल डेव्हलपमेंट ऑफिसर, बॉंबे स्टेट, पुणें C/o जिल्हा शेतकी अधिकारी, नागपूर यांच्याकडे पाठवावेत. प्रदर्शनांत ठेवावयाचे प्रकार ता. ४ मार्च रोजीं संध्याकाळपर्यंत अगर जास्तींत जास्त ५ मार्च, १९६० रोजीं दुपारीं १२ वाजेपर्यंत पोहोंचले पाहिजेत. त्यानंतर आलेले नमुने स्वीकारले जाणार नाहींत.

प्रदर्शनासंबंधीची अधिक माहिती हॉर्टिकल्चरल डेव्हलपमेंट ऑफिसर, बॉंबे स्टेट, पुणें–५ यांचेकडून मिळूं शकेल.

---

## मुंबई राज्याचा १९६०–६१ मधील योजना खर्च

### ९८·७५ कोटी रुपयांस मान्यता

मुंबई राज्याच्या वांट्याला १९६०–६१ साठी योजनाखर्चा-करितां ९८·७५ कोटी रुपये आले आहेत. त्यांपैकी सर्वांत मोठी रक्कम ( ३५ कोटी रु. ) शेतीला पाणीपुरवठा आणि विद्युत् योजना, ह्यासाठी आहे. त्यांत कोयना योजनेसाठी ७·५० कोटी रुपयांचा समावेश आहे. वीर आणि खडकवासला योजनांकरितां अनुक्रमें १ कोटी रु. आणि १·५० कोटी रु. अशी तरतूद आहे. घोड योजनेपैकी धरण पुरें झालें असून कालवे व्हावयाचे आहेत, त्यासाठी ७५ लक्ष रुपये मंजूर आहेत. शेती, त्याला अनुषंगिक कामें, सहकार आणि पंचायती ह्यांवर २२·६ कोटी रु. खर्च होतील. उद्योगधंद्यांच्या वांट्याला आलेल्या २·१९ कोटी रुपयांपैकी १·९३ कोटी रुपये ग्रामोद्योग आणि लहान आकाराचे उद्योग ह्यांसाठी आहेत.

---

### रेल्वे बजेट व जनरल बजेट ह्यांच्या तारखा

रेल्वे बजेट पार्लमेंटला दि. १७ रोजीं सादर केलें जाईल, जनरल बजेट २९ फेब्रुवारी रोजीं अर्थमंत्र्यांच्या वाढदिवशीं संध्याकाळीं ५ वाजतां सादर करण्यांत येईल. १४ मार्च ते १४ एप्रिल ही मुदत वेगवेगळया खात्यांच्या मागण्यांचे चर्चेसाठीं ठेवलेली आहे. अर्थमंत्री सुचवतील ते कर समाविष्ट असलेलें फिनॅन्स बिल १८, १९ व २० एप्रिल रोजीं चर्चिलें जाईल.

---

### राणीच्या वंशजांचें नवें आडनांव

आपल्या कांहीं वंशजांच्या आडनांवांत आपल्या पतीच्या आडनांवाचा–मौंटबॅटनचा–समावेश केला जाईल, असें ग्रेट-ब्रिटनच्या राणी एलिझाबेथनें जाहीर केलें आहे. त्यांना मौंटबॅटन–विंडसर हें आडनांव दिलें जाईल. बहुधा ह्या आठवड्यांत एलिझाबेथला जें अपत्य होईल, तिच्या नातवांचें आडनांव मौंटबॅटन–विंडसर असें राहील.

---

**ह्या गुलाबी हिरा कोणाचा?**—ब्रिटन, अमेरिका व युरोपमधील जवाहिऱ्यांत एका गुलाबी रंगाच्या हिऱ्यानें खळबळ उडवून दिली आहे. ह्या हिऱ्याचें वजन ३४·६४ कॅरेट असून त्याची किंमत कमींत कमी ७०,००० पौंड करण्यांत आली आहे. हिरा गोवळकोंडा येथील खाणींत सांपडला असावा व नंतर एखाद्या संस्थानिकाच्या मार्फत लंडन बाजारांत आला असावा असा अंदाज आहे.


**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : –श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
१ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
१ व्यापारी उलाढाली ४ सहकार


### परदेशांत नफ्याची निर्गत

भारतांत ज्यांच्या शाखा आहेत आणि ज्यांच्या नियंत्रणा-खालीं हिंदी कंपन्या आहेत, अशा विदेशी कंपन्यांनीं भारता-बाहेर नफा आणि डिव्हिडंड ह्यांच्या स्वरूपांत किती रकमा पाठविल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता येथें दिला आहे.

( आकडे लक्ष रुपयांचे )

| | ग्रेटब्रिटन | अमेरिका | स्वित्झरलंड | इतर देश | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९५६-५७ | ९१·१९ | १,५४·८ | २०·२ | १२·० | २,७८·९ |
| १९५७-५८ | १,७०·४ | २,१८·६ | १·२ | १०·३ | ४,००·५ |
| १९५८-५९ | ३,४५·५ | १,३०·५ | ०·४ | ५·६ | ४,८२·० |
| | ६,०७·८ | ५,०३·९ | २१·८ | २७·९ | ११,६१·४ |

---

### इडलीसाठीं तयार पीठ

म्हैसूर येथील मध्यवर्ती अन्न तंत्रविद्या संशोधन संस्थेनें इडलीसाठीं लागणारें पीठ तयार करण्याची पद्धति संशोधिली आहे, असें मध्यवर्ती शास्त्रीय संशोधन आणि सांस्कृतिक कार्य खात्याचे मंत्री डॉ. हुमायून कबीर यांनीं आज राज्यसभेंत प्रश्नोत्तरांच्या वेळीं सांगितलें. इडली करण्यापूर्वी, या तयार पिठांत एक चहाचा चमचाभर दहीं व आवश्यक तेवढें पाणी घालून तें आंबविण्यासाठी १०–१२ तास ठेवावें लागतें. याहिपेक्षा कमी वेळांत, म्हणजे सुमारें १० मिनिटांत आंबेल असें पीठहि या संस्थेनें तयार केलें असून त्यामुळें आतां झटपट आणि लवकर इडली बनवितां येणें शक्य झालें आहे. ह्या दोन्ही प्रकारचें पीठ तयार करण्यास आणि तें बाजारांत पाठविण्यास कांहीं फर्म्सनीं यापूर्वीच सुरुवात केली आहे.


सर्व तऱ्हेच्या बँकिंगचे व्यवहारासाठीं

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३१,००,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १४,६०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १५ कोटींचे वर |

] ५१ शाखांची सुविधा [

★ विशाल महाराष्ट्र, आंध्र व म्हैसूर राज्यांत बँकेच्या ५१ शाखा असल्यानें व्यवहारांत सुकरता.
★ बँकेची ३ व ५ वर्षांची कॅशसर्टिफिकिटें म्हणजे आकर्षक व्याजाचे दरानें सुरक्षित गुंतवणूक.
★ सेव्हिंग्ज व स्पेशल सेव्हिंग्जवर योग्य व्याज.
★ व्यापार व उद्योगधंद्याचे प्रगतीला आर्थिक साहाय्य.
★ फॉरिन एक्स्चेंज व्यवहाराची सोय.

मुख्य कचेरी भोरले बाजीराव रस्ता, पुणें २. | अधिक माहिती साठीं भेटा अगर लिहा. | चिं. वि. जोग, मॅनेजर.

## स्वस्त मोटारींऐवजीं आधीं या गोष्टी करा

श्री. संपादक "अर्थ" यांस,

स. न. तिसरी पंचवार्षिक योजना पूर्ण होण्यापूर्वी आपलें सरकार स्वस्त मोटारी देणार असल्याची गोष्ट खरी आहे काय? कारण, मोटार कारखानदारांनीं आतांपासूनच अमक्या किंमतीला मोटार देऊं अशा घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. या मोटारींची किंमत पांच ते साडेसात हजारांपर्यंत राहील. पण त्या खरेदी कोण करणार? आज जे सधन लोक मोटार खरेदीसाठीं १०–१२ हजार खर्च करूं शकतात तेच! मग हे लोक आपल्या जुन्या मोटारींचें काय करणार? अर्थात् विकणार! पण त्या घेणार कोण? वगैरेसारखे प्रश्न मध्यमवर्गीयांच्या मनांत येत असतील.

आज मध्यमवर्गीय व गरीब जनतेसमोर अन्न, वस्त्र व आसरा हे तीन प्रश्न उभे असून, अतोनात श्रम करूनहि या आवश्यक गरजा भागवितां येत नाहींत. शेती करणारांची परिस्थिति तर बिकटच होत चालली आहे. त्याला लागणारे नांगर, बैल, अवजारें व बंड्या यांच्या किंमती बेसुमार वाढत आहेत. या गरजा योग्य किंमत देऊन भागविता आल्या तर योजना आंखणाऱ्यांना व त्या आपुलकीनें अंमलांत आणणाऱ्यांना शेतकरी खचितच दुवा देतील.

लहान मोटारी स्वस्तांत देण्यासाठीं झटणाऱ्यांनीं, स्वस्तांत बैलानें चालणारी निर्दोष बंडी व अवजारें तयार करण्यांत आपलें सर्वस्व खर्ची घातलें तर देशाचें खरेखुरें कल्याण करण्यांत हातभार लावल्याचें पुण्य त्यांना लाभेल आणि आर्थिक लाभहि होईल. तसेंच बैलांची निपज करून ते शेतकऱ्यांना पुरविले तरीहि फार मोठें कार्य होणार आहे. यासाठीं सरकारी-निमसरकारी (अथवा पाव-सरकारी) कारखान्यांनीं पुढाकार घ्यावा. बंड्या किंवा शेतीच्या अवजारांसाठीं 'बाहेरच्या' देशांकडे धांव घ्यावी लागत नाहीं. सारांश, सरकारी तज्ज्ञांनीं या दृष्टीनें मन लावून कार्य करावें व कृषिप्रधान देशांतील जनतेचा दुवा घ्यावा.

धंतोली
६–२–६०

आपला
गो. आ. भोंसुले

---

**जर्मन पत्रकारांचीं पुस्तकें**—डॉ. ग्रिसो बॉन ह्या नांवाच्या एक जर्मन लेखिका सध्या भारताचा दौरा करीत आहेत. त्या भारतांत बऱ्याच हिंडणार असून नंतर दोन पुस्तकें लिहिणार आहेत. त्यांपैकी एक भारतीय नृत्यकलेसंबंधीं असेल व दुसरें कविवर्य टागोर ह्यांच्यासंबंधीं असेल. त्या जर्मनींतील जर्मनी–भारत समाजाच्या सल्लागार आहेत.

**कुटुंबनियोजनाला पाठिंबा**—न्यूयॉर्क येथील एका लोकसंख्याविषयक संघटनेच्या सहकार्यानें कराचींतील स्त्रियांचें कुटुंबनियोजनाविषयींचें मत अजमावण्याचा प्रयत्न करण्यांत आला. १०,००० स्त्रियांना ह्या बाबतींत विचारतां, त्यांपैकीं ५७ टक्के स्त्रियांनीं कुटुंबनियोजनाला पाठिंबा दिला. ९ टक्के स्त्रियांनीं आपला विरोध व्यक्त केला.

**ग्रामीण भागांतील आयुर्विमा**—राजस्थानांतील पंचायत समितींच्या साह्यानें ग्रामीण भागांत आयुर्विम्याचें काम मिळविण्याचें काम आयुर्विमा कॉर्पोरेशननें चालविलें होतें. आतां हें सर्व राजस्थानांत चालू होणार आहे. ग्रामीण भागांतून दरसाल १२ कोटींचें काम मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे.


**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,** लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : ४४८१.

**सूचना**

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षे | २¾ टक्के |
| ३ वर्षे | ३ टक्के |
| ५ वर्षे | ३½ टक्के |
| १० वर्षे | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ११–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

**दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.

(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग मांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें मांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था.

सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.